# ३३ . सुप्त शक्ती

रामायण तुम्ही वाचलेच असेल . **TV** वर बघितले असेल पण ही एक लहान गोष्ट बहुधा नजरेतून सुटली असेल असे मला वाटते .

आपल्या सर्वांनाच माहित आहे की सीता वनवासात असताना रावण तीला पळवून नेतो . राम माकडांची सेना घेऊन कन्याकुमारीपर्यंत जातो . समुद्र असल्यामुळे सर्वच जण तीथे थांबतात . आता सीतेचा शोध लंकेत लावायचा कसा ?
मारूती पण विचार करत असतो . त्यावेळी जांबूवंत त्याला आठवण करून देतो . काय आठवण करून देतो त्यासाठी आपल्याला मारूतीच्या लहानपणाकडे वळले पाहिजे .

मारूती लहान असतानाा खूप खोडयाळ असतो . एकदा तर सूर्य गिळायला निघाला होता . एकदा गुरूजी त्याला शाप देतात की तू खूप मस्तीखोर आहेस त्यामुळे ऐनवेळी तुला तुझ्या शक्तीचे विस्मरण होईल .
मारूती विसरलेला असतो की तो उडू शकतो . जांबूवंत त्याला आठवण करून देतो की हे मारूतीराया तू उडू शकतोस . तेव्हा तू उडडाण कर व लंकेत सीतामाईचा शोध घे .

काय दोस्तांनो आठवत होती का ही लहानशी गोष्ट ? काय म्हणालात माहीत होती पण पटकन आठवली नाही . हो म्हणजे मारूती सारखा तुम्हालाही शाप मिळालेला दिसतोय . असो .

प्रत्येक माणसाच्यात गुण / अवगुण असतात . बरेच वेळा त्याची जाणीव त्याला नसते . कारण आत्मपरिक्षणच केलेले नसते . कोणी त्याला जाणीव करून दिलेली नसते किंवा जाणीव करून दिल्यानंतर ही त्याचे विस्मरण झाले असते .
बरेच वेळा ‘ **Necessity is the mother of invention.** ’

असेही आढळून येते की गरज पडते तेव्हा माणसातले गुण आपोआप प्रकट होतात . आठवून बघा संवेदनाशील आई वडिलांच्या आजारपणात किती खंबीरपणे वागते . भांडत बसणारा धाकटा भाऊ आपणहून घरात मदत करू लागतो . ऑफिसात **Boss** च्या मदतीला कोणीतरी धावून येतो . याचा अर्थ असा नाही की वेळ पडली तरच शक्ती आठवावी .

प्रत्येकाने लहानपणापासून आपले गुण / अवगुण ओळखण्याचा सराव केला पाहिजे . त्यालाच **SWOT** असे म्हणतात .
**S: Strength W: Weakness O: Opportunity T: Threat.**

अर्थात माझ्यामते काही गुण उपजत / जन्माबरोबर मिळणारे असले तरी त्यात वाढ होऊ शकते. आपण नवीन गुण शिकू शकतो. त्यासाठी सवय लावून घ्यावी. पालकांनी, शिक्षकांनी मुलांच्यातील गुण ओळखावे. गुणांचा / अवगुणांचा कसा मागोवा घ्यावा त्याचे प्रशिक्षण बालवयातच दिले तर मोठेपणी त्याचा फायदाच होईल. पण ह्यासाठी प्रसंगी वाईटपणा घेणे आवश्यक असते.

ऑफिसमध्ये सुद्धा **Boss** ने प्रत्येक सहका-याला ओळखणे पाहिजे. प्रत्येकाचे **SWOT** विश्लेषण **Boss** कडे असेल तर ऑफिस कामाची विभागणी व पूर्तता चांगल्या रितीने होऊ शकेल.

मित्रांनो एक काम कराल. कागद पेन घ्या व आपले स्वतःचे **SWOT** विश्लेषण करा.
मोठया भावाला , सहका-याला तपासायला द्या व त्यानुसार अवगुणांचे प्राबल्य कमी करायचा प्रयत्न करा व बघा तुमचे आयुष्य कसे निरामय व सुंदर होईल.